2 3 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंधन समस्येवर संशोधन करु

## नवनियुक्त कुलगुरू डॉ. कामत यांचे प्रतिपादन : विद्यापीठातील डिपार्टमेंटमधील अंतर कमी करणार

- संशोधनातील प्रगती टेक्नॉलॉजी ट्रान्सफर्टमध्ये दिसावी
- संलग्नित कॉलेजेस सक्षम करणार
- विद्यापीठाने समाजासाठी, देशासाठी काम करावे
- विद्यापीठाचे प्लेसमेंट इतर विद्यापीठाचा तुलनेत कमी



जनप्रवास : कोल्हापूर

देशासमोर आता इंधनाची मोठी समस्या आहे. त्यावर हायड्रोजन प्रकल्प इंधनाचा कसा तयार करता येईल याच्या समितीवर मी काम करतोय. या प्रकारचे काही नवीन प्रोजेक्ट आणता येतील का, हे पाहिले जाईल. कृषी क्षेत्रासह इकॉनॉमिक्स, सोशल सायन्स विभागात शहरीकरणामुळे आणि येऊ घातलेले विविध प्रश्न सोडवण्याकडे लक्ष द्यावे लागेल, असे केले तर विद्यापीठाची प्रगती होईल, असा आशावाद शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी व्यक्त केला. त्यांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी विविध विषयांवर संवाद साधला.

कामत म्हणाले, नॅशनल इन्सिटट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमधील स्टेट युनिव्हर्सिटीजमध्ये शिवाजी विद्यापीठ ४५ क्रमांकावर आहे. आपला जो ट्रेन्ड आहे, तो १५० ते २०० च्या दरम्यान आहे. आता शिवाजी विद्यापीठाला नवीन उंचीवर नेवून ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे. विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल, हार्ड स्किल, लाईफ स्किल अशा सर्व गोष्टी देण्याची गरज आहे. अशावेळी इंटिलिजन्स कोशंटवर विश्वास ठेवता विद्यार्थ्यांच्या सोशल कोशंट, टिम कोशंट, रिझोलेश कोशंट असा प्रवास एनआयआरएफच्या माध्यमातून घडवायचा आहे. ॲफिलिएटेड अर्थात संलग्नित कॉलेजेस सक्षम करायची आहेत.

### देशहितासाठी संशोधन करावे

या विद्यापीठातंर्गत ३ जिल्हे येतात. एकिकडे दुष्काळी भाग आहे तर दुसरीकडे ओला दुष्काळी भाग आहे. क्लायमेट चेंज हा वेगळा विभाग विद्यापीठात स्थापन केला आहे. तो विभाग अधिक सक्षम करणार असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे. शिकवण्याची मुलभूत पध्दत बदलून नवीन पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. संशोधनात प्रगती केली पाहिजे. ती प्रगती केवळ पेपर पब्लिकेशनमधून न राहता टेक्नॉलॉजी ट्रान्सफर्टमध्ये केली पाहिजे, असेही डॉ. कामत म्हणाले.

### विद्यापीठाने समाजासाठी काम करावे

डॉ. कामत म्हणाले, सेंटर ऑफ एक्सलन्स ही संकल्पना राबवायची आहे. आपल्याकडे केंद्राचा कन्वर्जन्स हा नाविण्यपूर्ण प्रकल्प सुरु होत आहे. ज्यात ह्युमॅनिटीज, सोशल सायन्स, सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी हे विभाग एकत्र काम करु शकतात. यापूर्वी वेगवेगळ्या डिपार्टमेंटमध्ये जे अंतर होते, ते आता कमी होईल.

### पुन्हा नवीन आव्हाने...

नवीन नॅकच्या ॲक्रिडेशनचा पॅटर्न येत आहे. जेव्हा विद्यापीठात नॅकचे एप्लसप्लस ॲक्रिडेशन मिळाले तेव्हा मी संबंधित समितीवर डायरेक्टर होतो. आता पुन्हा नवीन बदल येताहेत. त्यामुळे पुन्हा नवीन आव्हाने यात असणार आहेत, असे सुतोवाच कुलगुरु डॉ. कामत यांनी केले.

### प्लेसमेंटच्या टक्केवारीबद्दल चिंता

शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंटबद्दल चिंता व्यक्त करत ते म्हणाले, विद्यापीठाचे प्लेसमेंट हे ५९ टक्के आहे. मध्य पगार ३ लाख इतकी आहे. अन्य काही विद्यापीठे पाहिली तर त्यांची प्लेसमेंट ८५ टक्केहून अधिक आहेत. तर मध्य पगार ८ लाख इतकी असते. आपल्याला नॅशनल इन्सिटट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क अर्थात एनआयआरएफच्या ५० मध्ये यायचे असेल तर विद्यार्थ्यांसाठी काम करावे लागणार आहे. त्यासाठी शिक्षणात आमुलाग्र सुधारणा ची गरज असल्याचे कामत यांनी अधोरेखित केली.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 MAY 2026

तरूण भारत

### कुलगुरु डॉ. राजनीश कामत : माजी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. कामत यांचा सत्कार

# मातृसंस्थेचे ऋण फेडण्यासाठी कटीबद्ध

**शिवाजी विद्यापीठाने मला घडवले आहे. या मातृसंस्थेचे ऋण फेडणे ही आता माझी सर्वात मोठी जबाबदारी आहे. विद्यापीठाला राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर अधिक सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख आणि विद्यार्थीकेंद्रित बनवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने काम करू, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केला.**

प्रतिनिधी, कोल्हापूर



कोल्हापूर : स्वागत समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. अजितसिंह जाधव व डॉ. सुहासिनी पाटील.

शिवाजी विद्यापीठात डॉ. कामत यांनी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सायंकाळी झालेल्या स्वागत समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा वारणा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. कामत यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला.

डॉ. कामत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या प्रशिक्षणामुळेच विविध ठिकाणी काम करताना आव्हानात्मक परिस्थितीतही यशस्वीपणे कार्य करता आले. होमी भाभा राज्य विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठासह इतर विद्यापीठांमध्ये काम करताना तंत्रज्ञानाधारित प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्ता, रिसर्जंट एआय, डिजिटल प्रणाली आणि परिणामकारक व्यवस्थापन यांच्या साहाय्याने अनेक प्रश्न सोडवता आले.

विद्यापीठातील शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, प्लेसमेंट आणि ब्रँडिंग या बाबींवर विशेष भर देणार आहे. बी.एस्सी. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, डेटा सायन्स, आयओटी, स्पोर्ट्स मॅनेजमेंट यांसारखे अभ्यासक्रम काळाची गरज आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत पावले उचलली जाणार आहेत.

डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक म्हणून विविध स्तरांवर कार्य केलेली व्यक्ती आज या विद्यापीठाचे नेतृत्व स्वीकारत आहे, हा अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आपल्यापेक्षा अधिक सक्षम आणि व्यापक अनुभव असलेले नेतृत्व मिळणे आवश्यक असते. तसे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाला डॉ. कामत यांच्या रुपाने मिळाल्याचा आनंद वाटतो.

यावेळी डॉ. जी. बी. कोळेकर, माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. सागर डेळेकर, प्रा. शंकरराव कुलकर्णी, डॉ. डी.आर. मोरे, डॉ. निखिल गायकवाड, तेजस्विनी गोरनाळे, धैर्यशील यादव, माजी कुलगुरू प्रा. एस. एच. पवार, नाथाजी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह माजी व विद्यमान पदाधिकारी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### स्वागतासाठी येणे टाळण्याचे आवाहन

**सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या बचतीच्या आवाहनाचा उल्लेख करत डॉ. कामत यांनी स्वागतासाठी अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले. इंधन, वेळ आणि राष्ट्रीय संसाधनांची बचत ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.**

2 3 MAY 2026

लोकसत्ता

# डॉ. राजनीश कामत यांनी कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारला



नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कार्यभार स्वीकारला. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. वैभव ढेरे आदी.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शुक्रवारी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबीय उपस्थित होते.

डॉ. कामत यांनी आज सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रीक वाहनातून केला. त्यांच्यासोबत पत्नी, मुलगी, आत्या यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. कामत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू दालनामध्ये पदाची सूत्रे स्वीकारली.

शिवाजी विद्यापीठातील प्रभारी कुलगुरू पदाचा कालखंड खूप चांगला पार पडला, असे मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी निरोप समारंभात सांगितले. शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिल्याबद्दल डॉ. ज्योती जाधव यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

2 3 MAY 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वांना सोबत घेऊन विद्यापीठाला उंचीवर नेऊ

## नवनियुक्त कुलगुरू डॉ. रजनीश कामत; पदभार स्वीकारल्यानंतर व्यक्त केला मानस



### क्लायमेट चेंज विभाग सक्षम करणार

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यात विविधता आहे. एका ठिकाणी दुष्काळ, तर दुसरीकडे ओला दुष्काळ अशी परिस्थिती आहे. संमिश्र गोष्टींना सामोरे जाण्यासाठी विद्यापीठातील क्लायमेट चेंज विभाग अधिक सक्षम करणार आहे. यातून शेतकऱ्यांना फायदा होईल. सेंटर ऑफ एक्सलन्स, मशीन लर्निंग, आयडिया शेअरिंग आदी नवीन गोष्टी सुरू करण्यावर भर राहील, असे कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

■ कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ समाजाभिमुख असून, याठिकाणी जे घडते ते समाज ठरवतो. विद्यापीठाचे ब्रँडिंग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यासाठी सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करणार आहे. अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी या सर्वांच्या साथीने शिवाजी विद्यापीठास आणखी नवीन उंचीवर नेण्याचा प्रयत्न राहील, असा मानस नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे नवीन कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आगामी पाच वर्षांतील ध्येयधोरणांची माहिती त्यांनी दिली. ते म्हणाले, २१ व्या शतकातील तिसऱ्या दशकाचे प्रश्न वेगळे आहेत. आयुष्य बदलत असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रवाह येत असल्याने नवीन नोकऱ्या येतील, काही जणांच्या नोकरी जातील, असे अनेक प्रश्न समोर आहेत. या पार्श्वभूमीवर पारंपरिक शिक्षण देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना कसे शिकायचे आणि ज्ञान आत्मसात करण्याच्या नव्या पद्धतीचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन केले जाईल. संशोधनात प्रगती करून चालणार नाही, तर तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे. देशाच्या हितासाठी संशोधन केले पाहिजे, असे ते म्हणाले. मानव जातीसमोरील महत्त्वाचे प्रश्न केवळ विज्ञान सोडवू शकत नाही, असे सांगून डॉ. कामत म्हणाले, यासाठी आंतरशाखा दृष्टिकोन विचारात घेतला जाईल. विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्कील्स, हार्ड स्कील्स, लाइफ स्कील देण्याबरोबर त्यांच्या प्लेसमेंटचा विचार केला जाईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 MAY 2026

जनप्रवास

# कुलगुरु डॉ. आर. के. कामत यांनी स्वीकारला पदभार

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शुक्रवारी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबीय उपस्थित होते.

डॉ. कामत यांनी शुक्रवारी सकाळी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रीक वाहनातून केला. त्यांच्यासोबत पत्नी, मुलगी आणि आत्या यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. कामत यांनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला. सोबत इतर मान्यवर.

भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रवेश केला. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडून त्यांनी कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली.

यानंतर लगेचच व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांचा औपचारिक निरोप समारंभ झाला. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्यासह विद्यापीठाच्या पहिल्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी, मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख आणि आंतरविद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनाही निरोप देण्यात आला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केले. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे,

▶ पान ४ वर

## कुलगुरु डॉ. आर. के. कामत यांनी स्वीकारला पदभार

▶ पान १ वरून : स्वागत परळेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठातील कामाची शिस्त कौतुकास्पद: डॉ. गोसावी**

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय शिस्त ही वाखाणण्याइतकी आहे. अधिकारी कोणीही असला तरी इथला प्रत्येक सहकारी त्याला नेमून दिलेले काम मन लावून करीत असतो. आवश्यक तेथे सूचना देण्यापलिकडे त्यांना वेगळे काही सांगावे लागत नाही. शिवाजी विद्यापीठातील ही कार्यप्रणाली कौतुकास्पद आहे. त्यामुळे येथील प्रभारी कुलगुरू पदाचा कालखंड खूप चांगला पार पडला, असे मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी निरोप समारंभात सांगितले.

**संधी दिल्याबद्दल कृतज्ञ : डॉ. ज्योती जाधव**

केवळ शिक्षण आणि संशोधन यापलिकडे न पाहणाऱ्या माझ्यासारख्या एका प्राध्यापकाला प्रशासकीय काम करण्याची संधी देऊन शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिल्याबद्दल मावळत्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी डॉ. गोसावी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या काळात खूप काही प्रशासकीय बाबी शिकून घेता आल्या, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2026 सकाळ,

# विद्यापीठाला जागतिकस्तरावर अधिक सक्षम बनविणार

## स्वागताच्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची ग्वाही

कोल्हापूर, ता. २२ : ज्या शिवाजी विद्यापीठाने मला घडवले, त्या मातृसंस्थेचे ऋण फेडणे ही आता माझी सर्वात मोठी जबाबदारी आहे. सर्वांच्या सहकार्याने विद्यापीठाला जागतिकस्तरावर अधिक सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख, विद्यार्थीकेंद्रित बनविणार असल्याची ग्वाही नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज स्वागत कार्यक्रमात दिली.

वारणा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. कामत यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला. विद्यापीठातील शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, प्लेसमेंट आणि ब्रँडिंग या बाबींवर विशेष भर देण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कम्प्युटिंग, हायड्रोजन इंधन संशोधन आणि आधुनिक प्रयोगशाळा उभारणी यावरही आगामी काळात भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठाचा विद्यार्थी, संशोधक, शिक्षक म्हणून विविध स्तरांवर काम केलेली व्यक्ती आज या विद्यापीठाचे नेतृत्व स्वीकारत आहे, हा आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. माजी कुलगुरू प्रा. एस. एच. पवार, माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. जी. बी. कोळेकर, सागर डेळेकर, शंकरराव कुलकर्णी, डी. आर. मोरे, निखिल गायकवाड, तेजस्विनी गोरनाळे, नाथाजी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले.

### डॉ. कामत म्हणाले

- हवामान, पर्यावरण बदल विभाग अधिक सक्षम करणार
- नव्या पद्धतीतून विद्यार्थ्यांना शिक्षण देणार
- अधिविभागांमधील अंतर कमी करणार
- 'एनआयआरएफ' रँकिंग वाढविणार
- संलग्न महाविद्यालयांना ताकद देणार
- इंधनाची समस्या सोडविण्यासाठी नवीन हायड्रोजन प्रकल्प

23 MAY 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजच्या प्लेसमेंटसाठी प्रयत्न

## आर. के. कामत : विद्यापीठातील कामाचा अजेंडा केला जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंटची टक्केवारी ५९ आहे. अनेक विद्यापीठांचे प्लेसमेंट ८५ टक्क्यांच्या पुढे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी काम करायचे असेल, तर त्यांना चांगल्या कंपनीत चांगल्या पॅकेजची प्लेसमेंट कशी मिळेल यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

डॉ. कामत यांनी कुलगुरूपदाचा पदभार घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठ समाजाभिमुख असून, या ठिकाणी जे घडते ते समाज ठरवितो. विद्यापीठाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रॅंडिंग करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणार आहे. २१ व्या शतकातील तिसऱ्या दशकाचे प्रश्न वेगळे आहेत. आयुष्य बदलत असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रवाह येत असल्याने नवनवीन नोकऱ्या येतील, काही जणांच्या नोकऱ्या जातील, असे अनेक प्रश्न समोर उभा आहेत. या पार्श्वभूमीवर पारंपरिक शिक्षण देण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी कसे शिकायचे, त्याचबरोबर ज्ञान आत्मसात करण्याच्या नव्या पद्धतींचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

### हवामान बदलावर काम करणार

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यांत विविधता आहे. एका ठिकाणी दुष्काळ, तर दुसरीकडे ओला दुष्काळ, अशी परिस्थिती आहे. यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यामुळे या गोष्टींना सामोरे जाण्यासाठी विद्यापीठातील हवामान, पर्यावरण बदल विभाग अधिक सक्षम करणार असल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले.

### इंधन समस्येसाठी हायड्रोजन प्रकल्प

युद्धामुळे इंधनाची समस्या भेडसावत आहे. हायड्रोजन प्रकल्पावर काम करीत असून, त्यासंदर्भातील काही नवीन प्रकल्प आणण्याचा प्रयत्न असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

### नव्या कुलगुरूंचा संकल्प

संशोधनाचा समाजहितासाठी कसा उपयोग होईल यावर भर.

मानवी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न.

विद्यापीठ अधिविभागांमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न. सर्व विभागांनी विद्यापीठासाठी व विद्यापीठाने समाजासाठी काम करायला हवे. - नवीन नॅक मूल्यांकनाचा पॅटर्न येत आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या काळात तयारी केली जाईल.

एनआयआरएफ रँकिंग वाढविण्याचा प्रयत्न

'एनईपी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आयक्यूपासून आरक्यूपर्यंतचा प्रवास घडवायचा आहे. संलग्न महाविद्यालयांना सक्षम करायचे आहे.

नवीन जागतिक प्रवाहांना सामोरे जाण्यासह सक्षम नागरिक घडविण्यावर भर.

विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, हार्ड स्किल्स, लाईफ स्किल देण्याबरोबर त्यांच्या प्लेसमेंटचा विचार केला जाईल.

सेंटर ऑफ एक्सलन्स, मशीन लर्निंग, आयडिया शेअरिंग, आदी नवीन गोष्टी सुरू करण्यावर भर राहील.

## कामत यांनी स्वीकारला कुलगुरूपदाचा पदभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शुक्रवारी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबीय उपस्थित होते.

डॉ. कामत यांनी सकाळी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रिक वाहनातून केला. विशेष म्हणजे या वाहनाचे सुकाणू त्यांनी स्वतःच हाती घेतले होते. त्यांच्यासोबत पत्नी ऋचा, कन्या रेवा आणि आत्या यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. कामत यांनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडून त्यांनी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली.

त्यानंतर लगेचच व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांचा औपचारिक निरोप समारंभ झाला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. महादेव देशमुख आणि डॉ. अभय साळी यांनाही निरोप देण्यात आला.



शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शुक्रवारी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली.

### विद्यापीठातील कामाची शिस्त कौतुकास्पद

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय शिस्त ही वाखाणण्याइतकी चोख आहे. वर अधिकारी कोणीही असला तरी इथला प्रत्येक सहकारी त्याला नेमून दिलेले काम मन लावून करीत असतो. विद्यापीठातील ही कार्यप्रणाली कौतुकास्पद स्वरूपाची असल्याचे डॉ. सुरेश गोसावी यांनी निरोप समारंभात सांगितले.

### संधी दिल्याबद्दल कृतज्ञ

केवळ शिक्षण आणि संशोधन यापलीकडे न पाहणाऱ्या माझ्यासारख्या एका प्राध्यापकाला प्रशासकीय काम करण्याची संधी देऊन शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिल्याबद्दल मावळत्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी डॉ. गोसावी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी त्या भावुक झाल्या.

2 3 MAY 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## नूतन कुलगुरू डॉ. राजनीश कामत : प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून स्वीकारला पदभार

# वैज्ञानिक दृष्टिकोन, विद्यार्थी केंद्रीत शिक्षणावर भर

त. भा. प्रतिनिधी



माजी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारताना डॉ. राजनीश कामत.

**कोल्हापूर :** शिक्षण क्षेत्रात मोठे बदल व नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. ही आव्हाने स्वीकारून विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे आवश्यक आहे. याचा विचार करून नवसंशोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर देत विद्यापीठाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण करून देणार आहे. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा घेऊनच शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवणार, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्त झालेल्या डॉ. राजनीश कामत यांनी शुक्रवारी सकाळी कार्यभार स्वीकारला. यावेळी माजी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी कुलगुरूपदाचा कार्यभार डॉ. कामत यांच्याकडे सुपूर्द केला. मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबियांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कामत यांनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रवेश केला. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडून त्यांनी कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली.

डॉ. राजनशी कामत म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा संगम असलेल्या या भूमीशी माझी नाळ जुळलेली आहे. ज्या विद्यापीठात मी शिकलो, घडलो, तिथेच कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.

डॉ. कामत यांनी नवीन संशोधन, तंत्रज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून युवा पिढीला घडविले जाईल. कृषीपूरक संशोधन, शेतकऱ्यांच्या हिताचे प्रकल्प व भविष्यातील ऊर्जा स्रोतांचा विचार करून हायड्रोजन संशोधनालाही प्राधान्य दिले जाईल. समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक अधिक वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे सांगितले. कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिष्ठाता प्रा. आर. व्ही. गुरव, प्रा. वर्षा मैंदरगी, प्रा. एम. एस. देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत पत्रकेकर यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास

**डॉ. कामत यांनी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रिक वाहनातून केला. विशेष म्हणजे, हे वाहन त्यांनी स्वत: चालविले. त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातील सदस्य होते.**

### शिवाजी विद्यापीठ माझे कुटुंब

**शिवाजी विद्यापीठ हे माझे कुटुंब आहे. या कुटुंबातून मी काही दिवस बाहेर गेलो होतो. आता पुन्हा कुलगुरू म्हणून कुटुंबात परत आलो आहे. मी एकटा कुलगुरू नसून शिवाजी विद्यापीठातील प्रत्येकजण कुलगुरू असल्याची भावना ठेवून सर्वांनी टीमवर्कने काम करण्याची गरज आहे. शिवाजी विद्यापीठाच्या हिताचे निर्णय घेऊनच शिवाजी विद्यापीठाचा वारसा अधिक समृद्ध करायचा आहे. त्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, अशी भावना डॉ. कामत यांनी व्यक्त केली.**

### डॉ. ज्योती जाधव भावूक

**माझ्यासारख्या एका प्राध्यापकाला प्रशासकीय काम करण्याची संधी देऊन शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिला. या काळात डॉ. गोसावी यांच्याकडून खूप काही प्रशासकीय बाबी शिकता आल्या, असे म्हणत डॉ. ज्योती जाधव भावूक झाल्या.**

23 MAY 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. कामत यांनी स्वीकारली कुलगुरुपदाची सूत्रे



शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शुक्रवारी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबीय उपस्थित होते.

डॉ. कामत यांनी सकाळी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रिक वाहनातून केला. विशेष म्हणजे या वाहनाचे सुकाणू त्यांनी स्वतःच हाती घेतले होते. त्यांच्यासोबत पत्नी, मुलगी आणि आत्या यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. कामत यांनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रवेश केला. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडून त्यांनी कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली.

यानंतर लगेच व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांचा औपचारिक निरोप समारंभ झाला.

यावेळी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख आणि आंतरविद्या शाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनाही निरोप देण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते.

## प्रशासकीय कामाची शिस्त कौतुकास्पद : डॉ. गोसावी

विद्यापीठातील प्रशासकीय शिस्त ही वाखाणण्याइतकी चोख आहे. वरिष्ठ अधिकारी कोणीही असला तरी इथला प्रत्येक सहकारी त्याला नेमून दिलेले काम मन लावून करत असतो. आवश्यक तेथे सूचना देण्यापलीकडे त्यांना वेगळे काही सांगावे लागत नाही. विद्यापीठातील ही कार्यप्रणाली कौतुकास्पद आहे. त्यामुळे येथील प्रभारी कुलगुरुपदाचा कालखंड खूप चांगला पार पडला, असे मावळते प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

## संधी दिल्याबद्दल कृतज्ञ : डॉ. ज्योती जाधव

केवळ शिक्षण आणि संशोधन यापलीकडे न पाहणाऱ्या माझ्यासारख्या एका प्राध्यापकाला प्रशासकीय काम करण्याची संधी देऊन शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिल्याबद्दल मावळत्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी डॉ. गोसावी यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. या काळात खूप काही प्रशासकीय बाबी शिकून घेता आल्या, असेही त्यांनी सांगितले.

2 3 MAY 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी संख्या वाढविण्याचे गांभीर्याने घ्या

## कुलगुरू डॉ. आर. के. कामत : परीक्षा मंडळाचे केले कौतुक

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठ हे माझे कुटुंब असून, त्याच्या पाठबळावर मी इथली शिक्षणाची समृद्ध परंपरा पुढे नेणार असल्याचे सांगत नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज पहिल्याच दिवशी काम सुरू केले. त्यांनी परीक्षा मंडळाच्या कामाचे कौतुक केले. त्यासह कॅम्पसवरील विद्यार्थी संख्या वाढवण्याबाबत गांभीर्याने कार्यवाही करा, अशी स्पष्ट सूचना अधिविभागांना केली.

कुलगुरू डॉ. कामत यांनी आज प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबीय उपस्थित होते. कार्यभार स्वीकारल्यानंतर डॉ. कामत यांनी काम सुरू केले. त्यांनी खानापूर येथील कॉलेजच्या प्राचार्यांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.



दरम्यान, डॉ. कामत यांनी आज सकाळी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रिक वाहन स्वतः चालवित केला. त्यांच्यासोबत पत्नी, मुलगी, आत्या, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुतळा, डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही अभिवादन करून विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रवेश केला. यानंतर डॉ. गोसावी यांचा औपचारिक निरोप समारंभ झाला.

या कुलगुरुपदाच्या माध्यमातून मला मातृसंस्थेच्या ऋणातून उतराई होण्याची संधी मिळाली आहे. त्याबद्दल कुलपती जिष्णू देव वर्मा, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा मी आभारी आहे. विद्यापीठातील सर्व सहकारी मला तत्परतेने मदत करतील, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय शिस्त ही वाखाणण्याइतकी चोख आहे. त्यामुळे प्रभारी कुलगुरू पदाचा कालखंड चांगला पार पडल्याचे डॉ. गोसावी यांनी सांगितले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, वर्षा मैंदर्गी, महादेव देशमुख यांना निरोप दिला. डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाला मिळाले अडीच कोटी

डीएसटी-पर्स योजनेतून विद्यापीठाला पाच वर्षांपूर्वी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. तो निधी मिळेपर्यंत विद्यापीठाने स्वतःफंडातून संशोधनाला आर्थिक पाठबळ दिले. आज डीएसटी-पर्सकडून संबंधित निधी विद्यापीठाला मिळाल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले.

### प्रभारी प्र-कुलगुरू झाल्या भावूक

■ केवळ शिक्षण आणि संशोधन यापलीकडे न पाहणाऱ्या माझ्यासारख्या एका प्राध्यापकाला प्रशासकीय काम करण्याची संधी देऊन विद्यापीठाची पहिली महिला प्रभारी प्र-कुलगुरू होण्याचा मान दिलाय, याबद्दल डॉ. गोसावी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करताना मावळत्या डॉ. ज्योती जाधव या भावूक झाल्या. या काळात खूप काही प्रशासकीय बाबी शिकून घेता आल्या, असे त्यांनी सांगितले.

2 3 MAY 2026
पुढारी

# विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रँडिंग करणार

## नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचा मानस

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठ समाजाभिमुख असून याठिकाणी जे घडते ते समाज करतो. विद्यापीठाचे ब्रँडिंग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यासाठी सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करणार आहे. येणाऱ्या काळात विद्यार्थी व समाजहिताचे काम होईल. शिवाजी विद्यापीठास आणखी नवीन उंचीवर नेण्याचा प्रयत्न राहील, असा मानस नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे नवीन कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आगामी पाच वर्षांतील ध्येय-धोरणांची माहिती त्यांनी दिली. डॉ. कामत म्हणाले, २१ व्या शतकातील शिक्षणाच्या दशकाचे प्रश्न वेगळे आहेत. आयुष्य बदलत असून कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रवाह येत असल्याने नवीन नोकऱ्या येतील, काहीजणांच्या नोकरी जातील, असे अनेक प्रश्न समोर आहेत. या पार्श्वभूमीवर पारंपरिक शिक्षण देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना कसे शिकायचे- व ज्ञान आत्मसात करण्याच्या नव्या पद्धतींचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन केले जाईल. संशोधनात प्रगती करून चालणार नाही तर तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे. देशाच्या हितासाठी संशोधन केले पाहिजे, असे ते म्हणाले.

नॅक मूल्यांकनाचा नवीन पॅटर्न येत आहे. त्या अनुषंगाने येणाऱ्या काळात तयारी केली जाईल. 'एनआयआरएफ' रँकिंग वाढविण्याचा प्रयत्न असणार आहे. 'एनईपी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आरंभापासून ते आत्मपूर्णतेचा प्रवास घडविण्याबरोबरच संलग्न महाविद्यालयांना सक्षम करणार आहे. नवीन जागतिक प्रवाहांना समोर जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, हार्ड स्किल्स, लाईफ स्किल्स दिले जातील. सुजाण सक्षम नागरिक घडविण्यावर भर राहील, असे कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

### इंधन समस्या सोडविण्यासाठी हायड्रोजन प्रकल्प आणणार

सध्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाची समस्या भेडसावत आहे. हायड्रोजन प्रकल्पावर काम करीत असून त्यासंदर्भातील काही नवीन प्रकल्प आणण्याचा प्रयत्न आहे. शहरीकरणाचे प्रश्न सोडविण्यासाठी अर्थशास्त्र व सामाजिकशास्त्र यांच्या माध्यमातून प्रश्न कसे सुटतील याकडे लक्ष दिले जाईल, असे कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

### क्लायमेट चेंज विभाग अधिक सक्षम करण्यावर भर

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यांत विविधता आहे. एका ठिकाणी पूर तर दुसरीकडे ओला दुष्काळ अशी परिस्थिती आहे. यासारख्या गोष्टींना सामोरे जाण्यासाठी विद्यापीठातील क्लायमेट चेंज विभाग अधिक सक्षम करणार आहे. याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. सेंटर ऑफ एक्सलन्स, मशिन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आदी नवीन गोष्टी सुरू करण्यावर भर राहील, असे कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 MAY 2026

# विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिन

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गुरुवारी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद आणि हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, वसंत एकले, सुजीत मुंढे, संदीप हेगडे, सुजीत सकटे, सैफ सज्जन, अनिकेत पाटील, जुबेर पठाण यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ ग्रहण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. कबीर खराडे आदी.**

### देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता

दहशतवाद व हिंसाचारविरोधी पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवणे, देशासाठी तसेच दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग आणि बलिदानाचा सन्मान करणे तसेच भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता निर्माण करणे असा यामागील हेतू आहे.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 MAY 2026

# 'रवळनाथ'तर्फे कुलगुरु डॉ. कामत यांचा सत्कार



शिवाजी विद्यापीठ कुलगुरु डॉ. कामत यांचा सत्कार करताना रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष व संचालक एम. एल. चौगुले शेजारी चेअरमन प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, कोल्हापूर शाखेचे चेअरमन विजय हरगुडे आदी.

**जनप्रवास : गडहिंग्लज**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी (मल्टी-स्टेट), प्रधान कार्यालय गडहिंग्लज या संस्थेतर्फे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मा. प्रा. (डॉ.) आर. के. कामत यांची निवड झाल्याबद्दल रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष व संचालक एम. एल. चौगुले यांनी कोल्हापूर येथे त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि संस्थेतर्फे त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी एम. एल. चौगुले यांनी प्रा. (डॉ.) आर. के. कामत यांना रवळनाथ को ऑप. हौसिंग फायनान्सची माहिती दिली. संस्थेची कार्यप्रणाली आणि अल्पावधीतील प्रगती याविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले.

डॉ. कामत यांना शैक्षणिक क्षेत्रातील मोठा अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून काम पाहिले. त्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई येथे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून त्यांची निवड झाली होती. तसेच शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माध्यमातून उच्चशिक्षण क्षेत्रात त्यांनी योगदान दिले आहे. अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या देखील यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत.

याप्रसंगी चेअरमन प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, कोल्हापूर शाखेचे चेअरमन विजय हरगुडे, शाखा सल्लागार अमृत सुतार, भास्कर सांगावकर, प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी उपस्थित होते.

2 3 MAY 2026 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मातृसंस्थेचे ऋण फेडण्यासाठी कटिबद्ध

## कुलगुरू डॉ. आर. के. कामत; शिवाजी विद्यापीठात स्वागत समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्या शिवाजी विद्यापीठाने मला घडवले, त्या मातृसंस्थेचे ऋण फेडणे ही आता माझी सर्वात मोठी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वागत समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी वारणा समूह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कुलगुरू डॉ. कामत यांनी विद्यापीठाला राष्ट्रीय व जागतिक स्तरावर सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख आणि विद्यार्थीकेंद्रित बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. जी. बी. कोळेकर, माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. सागर डेळेकर, प्रा. शंकरराव कुलकर्णी, डॉ. डी. आर. मोरे, धैर्यशील यादव, माजी कुलगुरू प्रा. एस. एच. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वागत समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. व्यासपीठावर डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील. (छाया : पप्पू अत्तार)**

### महामानवांना अभिवादन

कुलगुरू डॉ. कामत यांनी शुक्रवारी सायंकाळी बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांचा पुतळा, दसरा चौकातील छत्रपती शाहू महाराज व ताराराणी चौकातील महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 MAY 2026

पुढारी





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर.के. कामत यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. दुसऱ्या छायाचित्रात नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी इलेक्ट्रिक वाहन स्वतः चालवत विद्यापीठाच्या प्रांगणातील महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. (छाया : पप्पू अत्तार)

# कुलगुरू डॉ. कामत यांनी पदभार स्वीकारला

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर.के. कामत यांनी शुक्रवारी सकाळी प्रभारी कुलगुरू तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी मावळत्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कामत कुटुंबिय उपस्थित होते.

डॉ. कामत यांनी सकाळी कुलगुरू निवासस्थानापासून विद्यापीठाच्या प्रांगणामधील सर्व प्रवास इलेक्ट्रीक वाहनातून केला. विशेष म्हणजे वाहनाचे सुकाणू त्यांनी स्वतःच हाती घेतले होते. त्यांच्यासोबत पत्नी, मुलगी व आत्या यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे होते. डॉ. कामत यांनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडून त्यांनी कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत पळेकर उपस्थित होते.

## ...या मान्यवरांचाही निरोप समारंभ

व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, विद्यापीठाच्या पहिल्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचा औपचारिक निरोप समारंभ झाला. याप्रसंगी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी, मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख व आंतरविद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांना निरोप देण्यात आला.

जनसंपर्क कक्ष

2 3 MAY 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचाराविरोधात शपथ

शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे तसेच भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता निर्माण करणे असा यामागील हेतू आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, वसंत एकले, सुजीत मुंढे, संदीप हेगडे, सुजीत सकटे, सैफ सज्जन, अनिकेत पाटील, जुबेर पठाण यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.